॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६


जळगाव.9 ( ) विवेक, नैतिकता आणि सद्विवेकबुध्दी यांची आधुनिक विज्ञानाशी सांगड घालताना अनेक उदाहरणे देताना सुप्रसिध्द वैज्ञानिक तथा एल.व्ही.प्रसाद आय.इन्स्टिटयूट, हैदराबादचे संशोधन संचालक पद्श्री डी.बालसुब्रहमण्यन यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील यशोवल्लभ व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने यशोवल्लभ व्याख्यानमालेतंर्गत आज दि.9 फेब्रुवारी विद्यापीठाच्या अधिसभागृहात पद्श्री डी.बालसुब्रहमण्यन यांनी ‘ जाणीव, सद्सदविवेकबुध्दी व नैतिकता- आधुनिक विज्ञानासंदर्भात ’ या विषयावर मांडणी केली. प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.यावेळी ॲड.गिरीधरलाल गुजराथी यांची मुख्य उपस्थित होते.

श्री.बालसुब्रहमण्यन म्हणाले की, विज्ञानाचा झपाटयाने विकास होत आहे. भौतिक जगाच्या गोष्टी जाणीवेतून प्रत्यक्ष पाहता येतात. मात्र त्या पलिकडच्या गोष्टींची नेणीवेतूनच अनुभूती घेता येऊ शकते. प्रत्येक गोष्टीच्या चेतनेची अनूभूती घेता येऊ शकते का असा सवाल उपस्थित करताना त्यांनी जीवशास्त्र, रसायनशास्त्राच्या पातळीवर स्पष्टीकरण दिले. जीवशास्त्र पातळीवर तयार होणारे सेल यांच्यातील परस्पर संवाद स्पष्ट करताना अस्तित्वाची स्वीकृत, ओळख अशी काही उदाहरणे त्यांनी सांगितली. झाडांना चेतना नसते मात्र लाजाळूच्या झाडाला हात लावल्यावर त्यात घडणाऱ्या रासायनिक बदलांबद्दल आपण चुकीचे समज करुन घेतो आणि झाडांना चेतना असते असे समजतो. परंतु झाडाना विचार शक्ती नसते. मानवी मेंदू मात्र स्वतंत्र विचारशक्ती करणारा आहे. योग्य आणि वाईट व्यक्तची नैतिक भावना, व्यक्तीची नैतिक जाणीव हे मुद्दे स्पष्ट करताना त्यांनी कर्तव्याची जाणीव काय असली पाहिजे हे सांगितले.

विवेकाचा योग्य वापर केला तर अनेक प्रश्न सुटतील असे सांगून बालसुब्रहमण्यन यांनी काही वेळा देशप्रेम आणि अनैतिकता कशी पणाला लागते हे सांगताना नाझींनी निष्पापांची हत्त्या करुन सिध्द केलेले देशप्रेम नैतिक कसे म्हणणार असा सवाल उपस्थित केला. नैतिकता आणि विवेक यांचा संगम असेल तर काही चांगले बदल समाजात घडत असतात. नैतिकतेमध्ये व्यक्तीपरत्वे फरक असू शकतो. मात्र नैतिकता बदलणारी नसावी अशी आशा व्यक्त केली. सद्सद्विवेकबुध्दीचे समाजशास्त्रीय उदाहरणे देताना गर्भपात, गुलामांचा व्यापार, पशु व मानवी चाचणी यांचा उल्लेख केला. नैतिकता आणि विवेक यांची सांगड घालण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. नितीन गुजराथी यांनी व्याख्यानमालेची भूमिका विशद केली. डॉ.भूषण चौधरी यांनी सुत्रसंचालन केले व आभार मानले.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. ९ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी